# मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगररचना विभाग**

**स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.के. स्कूलच्या बाजूला, कनाकिया, मिरारोड (पु.)**

मुख्य कार्यालय भाईंदर.

जा.क्र. मनपा/नर/ 3206/2018-19 दिनांक:- 6/8/2018

Bhd. (Legal) 1807

## // भोगवटा दाखला //

प्रति,

1) मे. अनिष ॲण्ड असो., (सल्लागार अभियंता)
शॉप नं. 1 व 2, भैरव सृष्टी, तळमजला, धनलक्ष्मी बँक,
150 फिट रोड, भाईंदर (पश्चिम), जिल्हा ठाणे.

2) मे. ओम साई चरण बिल्डर्स (विकासक)
श्वेता रेसीडेन्सी, बि.नं.1 सो.लि., अ/704, वागड नगर,
रामदेव पार्क, मिरारोड (पूर्व)

विषय - मौजे गोडदेव, स.क्र.(जुना) 80/4 (नविन) 6/4 या जागेतील " इमारत नं.3 विंग 'अे' (स्टिल्ट + 6 पार्ट) व विंग बी (स्टिल्ट + 5) (सल्लागार अभियंता प्रस्तावित "साई चरण कॉम्पलेक्स") या इमारतीसाठी भोगवटा दाखला मिळणेबाबत.

संदर्भ - 1) मे. अनिष ॲण्ड असो., (सल्लागार अभियंता) यांचा दि.04/07/2018 रोजीचा अर्ज.

2) मे.सक्षम प्राधिकारी नागरी संकुलन ठाणे यांचेकडील 10(3), 10(5) ची व दुर्बल घटक योजनेची कार्यवाही झालेली असल्याबाबत विकासकाने रु.300/- च्या स्टँम्प पेपरवर दिलेले दि.11/06/2018 रोजीचे शपथपत्र

3) मा. जिल्हाधिकारी कार्यालयाकडील पत्र क्र. महसूल/क-1/टे-2/गोडदेव- ठाणे/एनएपी/एसआर-(261/2013)85/2014, दि.20/08/2014 अन्वये अकृषिक आदेश.

4) मिरा भाईंदर महानगरपालिकेकडील इमारत क्र. "अे व बी" साठी पत्र क्र. मनपा/नर/4296/2017-18, दि.09/02/2018 अन्वये सुधारीत नकाशे मंजुरीस सुधारीत बांधकाम परवानगी

5) मिरा भाईंदर महानगरपालिकेकडील पत्र क्र. मनपा/नर/1839/2017-18 दि.09/08/2017 अन्वये जोत्याचा दाखला.

6) मे. अनिष ॲण्ड असो.. यांनी इमारत पूर्णत्वाचा (Building Completion Certificate) दि. .03/07/2018 रोजीचा इमारत पुर्णत्वाचा दाखला.

7) मे. अनिष ॲण्ड असो. यांचेकडील इमारतीचे बांधकाम तांत्रिकदृष्टया योग्य असलेबाबतचा दि.03/07/2018 रोजीचा दाखला.

8) मे. ड्रॉपलेट कन्सल्टंट यांनी दि. 28/05/2018 रोजीचा प्लंबींग बाबतचा दाखला.

9) मिरा भाईंदर महानगरपालिकाचे सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी पत्र क्र.मनपा/सांबा/2367/2018-19 दि.02/07/2018 अन्वये सोलार वॉटर हिटींग सिस्टीमचा नाहरकत दाखला.

10) महानगरपालिकाचे रेन वॉटर हार्वेस्टींग प्रकल्पाची उभारणी केलेबाबतचे पाणीपुरवठा विभागाकडील पत्र क्र.मनपा/पापु/421/2018-19, दि.11/06/2018 अन्वये सादर

11) महानगरपालिकाचे अग्निशमन विभागाकडील क्र.मनपा/अग्नि/209/2018-19, दि.04/06/2018 अन्वयेचे अंतिम नाहरकत दाखला

12) महानगरपालिकाचे उद्यान व वृक्षप्राधिकरण यांचेकडील पत्र क्र. मनपा/वृप्रा/210/2018-19 दि. 04/07/2018 अन्वये नाहरकत दाखला.

13) विकासकाचे दि.11/06/2018 रोजीचे शपथपत्रे.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगररचना विभाग**

**स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.के. स्कूलच्या बाजूला, कनाकिया, मिरारोड (पु.)**

जा.क्र. मनपा/नर/ 3205/2018-19 दिनांक:- 6/8/2018

Bhd. (Legal) 1807

**महोदय,**

विषयांकित जागेमधील **रहिवास** वापराच्या " प्रस्तावित इमारत नं.3 विंग 'अे' (स्टिल्ट + 6 पार्ट) व विंग बी (स्टिल्ट + 5) (सल्लागार अभियंता प्रस्तावित "साई चरण कॉम्पलेक्स"), क्षेत्र 1725.47 चौ.मी. चे बांधकाम As Built नकाशाप्रमाणे सल्लागार अभियंता मे. अनिष ॲण्ड असो., (नोंदणी क्र. एमएनपी/एनआर/194/99-2000 दि.13/05/1999 व दि.31/12/2018 पर्यंतची मुदतवाढ) यांच्या देखरेखीखाली पुर्ण झालेले असून सदरचे बांधकाम तांत्रिकदृष्टया योग्य असल्याबाबत संरचना अभियंता मे. अनिष ॲण्ड असो. व सदर इमारतीच्या प्लंबींगचे काम योग्य झालेबाबत परवानाधारक मे. ड्रॉपलेट कन्सल्टंट यांनी दाखले दिलेले आहेत. यास्तव सदर **वरीलप्रमाणे** साठी खालील अटीशर्तीच्या अधिन राहुन इमारतीसाठी नकाशाप्रमाणे भोगवटा दाखला देण्यात येत आहे.

<u>अटीशर्ती</u> -

1) संदर्भिय पत्र क्र. 4 अन्वयेच्या बांधकाम परवानगी / सुधारीत बांधकाम परवानगी मधील अटीशर्तीचे व विकासकाच्या संदर्भ क्र. 13 अन्वयेच्या शपथपत्राचे पालन करणे बंधनकारक राहिल.
2) जर
   अ) मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना आवश्यकता वाटल्यास कोणत्याही प्रकारची पुर्तता करणेस कळविल्यानंतर किंवा कोणताही प्रकारचा प्रतिबंध केल्यानंतर त्याचे पालन नाही केल्यास.
   ब) आपण कोणत्याही प्रकारची माहिती लपवून किंवा चुकीची माहिती सादर करुन परवानगी / भोगवटा दाखला प्राप्त करुन घेतल्याचे मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांची खात्री झालेनंतर सदरचा दाखला रद्द करणेचे अधिकार मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना आहेत
3) सदर इमारतीच्या बांधकामामध्ये भविष्यात कोणत्याही प्रकारचे फेरबदल करावयाचे झाल्यास त्याबाबत महानगरपालिकेची परवानगी प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.
4) सदरच्या दाखल्यामध्ये नमुद केलेल्या वापरा व्यतिरिक्त भविष्यात बदल केल्याचे निदर्शनास आल्यास सदरचा दाखला रद्द समजणेत येवून पुढील कार्यवाही करणेत येईल.
5) सदरच्या दाखल्यामुळे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 मधील कोणत्याही तरतुदी अन्वयेच्या कार्यवाहीसाठी बाधा येणार नाही.
6) सदरच्या दाखल्यामुळे अर्जदारास त्यांच्या मालकीच्या नसलेल्या कोणत्याही जमिनीचा कोणत्याही प्रकारे वापर करता येणार नाही.
7) सदर जागेच्या मालकीबाबतच्या मा. न्यायालयात सुरू असलेल्या दाव्याबाबत मा. न्यायालयाच्या आदेशाचे पालन करणे विकासकावर बंधनकारक राहील. त्याबाबत महानगरपालिकेची कोणत्याही प्रकारची जबाबदारी राहणार नाही.
8) अर्जदारांनी सादर केलेल्या दि. 11/06/2018 रोजीच्या शपथपत्राप्रमाणे मलनिस्सारण व्यवस्था, सांडपाणी व्यवस्था, पाणीपुरवठा व्यवस्थाबाबत देखभाल दुरुस्ती करणे बंधनकारक राहिल.
9) सदर इमारतीचा वापर सुरु करणेपुर्वी सदर दाखला वेळी सादर केलेल्या सर्व विभागाकडील नाहरकत दाखला / प्रमाणपत्र / परवानगी यामधील अटीशर्तीची पुर्तता करणे बंधनकारक राहिल.
10) रेखांकनामधील वाहनतळाची जागा व आर.जी. ची जागा कायमस्वरुपी सार्वजनिक वापरासाठी खुली ठेवणे बंधनकारक राहिल.

मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय भाईंदर.

(बालाजी खतगांवकर)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका
6/8/18

प्रत - 1) कर संकलक व निर्धारक
2) विभाग प्रमुख, अतिक्रमण तथा अनाधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग